# महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण- २०१९/ प्र. क्र. ६९/ नोंदणी व भांडार शाखा
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
२५, मर्झबान पथ, फोर्ट , मुंबई-०१
दिनांक :- २९/०७/२०२०

Tender Notice for Annual Maintence Repair Contract for Spilt Air Conditioner

**स्पिल्ट एअर कंडिशनच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती सेवा संविदा करारासाठी दरपत्रके मागविणेबाबत.**

ग्राम विकास विभागातील १२ एअर कडिशनच्या दिनांक १ ऑगस्ट,२०२० ते ३१ जुलै, २०२१ या कालावधीत देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. दरपत्रकाच्या अटी व शर्ती विचारात घेवून स्पिल्ट एअर कंडिशनच्या वार्षिक सेवा संविदा (देखभाल) करारासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**दरकराराच्या अटी व शर्ती**

१. मोहोरबंद लिफाफ्यावर "स्पिल्ट एअर कंडिशन देखभाल करण्याकरीता दरपत्रक" असे लिहिणे आवश्यक आहे. या लिफाफ्यामध्ये फॉर्म "अ" तांत्रिक दरपत्रक व फॉर्म "ब" अतांत्रिक दरपत्रक असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे तशा उल्लेखासह ठेवावेत. अशाप्रकारे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक सादर करावेत, अन्यथा दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

२. दरपत्रकासोबत आपल्या कंपनीचे खालील कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.

१) कंपनी पॅन कार्ड.
२) मागील तीन वर्षाचे I.T. भरल्याचे कागदपत्रे.
३) GST नोंदणी प्रमाणपत्र.
४) दुकाने व संस्था अधिनियम १९४८ प्रमाणपत्र किंवा ई-उद्योग आधार प्रमाणपत्र.
५) एअर कंडीशन देखभाल व दुरुस्ती बाबत मागील तीन वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र.
६) एअर कंडीशन सर्व्हिसिंग तथा दुरुस्ती करण्याकरीता वातानुकूलीत यंत्रे असणाऱ्या कंपनीचे मान्यता असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

३. प्रत्येक A.C. ची वर्षातून चार वेळा सर्व्हिसिंग करणे बंधनकारक असेल. A.C. दुरुस्ती, किंवा आवश्यकते प्रमाणे पार्ट बदलणे या सर्वबाबींचा समावेश दरकरारामध्ये असेल. याकरीता वेगळयाने रक्कम आकारली जाणार नाही.

४. एअर कंडिशनची नियमित देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासाठी तात्काळ सेवा मिळणे बंधनकारक राहील.

५. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धाराकाची सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

६. मोहोरबंद दरपत्रके लिफाफे उघडतेवळी दरपत्रधारक स्वत: किंवा त्याचा एक प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

७. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

८. दरपत्रक सोबतच्या विहित फॉर्मसह, दरपत्रकाचे रु.१००/- (ना परतावा) शुल्क रोखीने कक्ष अधिकारी, रोखशाखा, ग्राम विकास विभाग, पोटमाळा, विस्तार इमारत मंत्रालय, मुंबई येथे भरावे. तसे चलन तांत्रिक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

९. बयाणा रक्कमेचा रु. ५,०००/- (EMD) section officer, Rural Development Department यांचे नावे काढलेला धनाकर्ष/धनादेश दरपत्रकासोबत देणे आवश्यक आहे.
१०. देखभाल व दुरुस्तीचे काम असामाधानकारक आढळल्यास सेवा करार रद्द करण्यात येईल व देण्यात आलेली रक्कम वसूल करण्यात येईल.
११. याबाबत कोणताही वाद झाल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र मुंबई राहील.
१२. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय होणार नाही.
१३. दरपत्रक उघडण्याची तारीख व वेळ आपण नमूद केलेल्या ई-मेल/दूरध्वनीवर कळविण्यात येईल. त्यासाठी लिफाफ्यावर ई-मेल पत्ता व दूरध्वनी क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा. याबाबतची जबाबदारी पुरवठादाराची राहील.
१४. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार ग्राम विकास विभाग राखून ठेवत आहे.

उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे भाग-१ तांत्रिक दरपत्रक फॉर्म अ मध्ये नमूद असेल तरच निविदाधारकांच्या दरपत्रकाबाबत विचार करण्यात येईल.

| अ.क्र. | निविदा प्रक्रियेचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द झाल्याचा दिनांक | ०३/०८/२०२० |
| ३ | निविदा सादर करण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | ०३/०८/२०२० ते १४/०८/२०२० ५.०० वाजेपर्यंत |
| ५ | निविदा उघडण्याचा दिनांक | निविदा उघडण्याचे निविदाधारकास ई-मेल अथवा दूरध्वनीवर कळविण्यात येईल. या करीता लिफाफ्यावर ई-मेल व दूरध्वनी क्रमांक लिहिणे गरजेचे आहे. |

(अ.जो. तेलवेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

दिनांक :- २९/०७/२०२०
ठिकाण:- मुंबई